CNR No:-MHRG120003202021 नियमीत दिवाणी दावा क्र. २५/२०२१
विलास वि. सुधीर व इतर

## निशाणी क्र. १९ कडील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीने दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ३९ नियम १ व २ नुसार मौजे कोलमांडले, ता. मुरुड, जि. रायगड येथील गट नं.१२/२ क्षेत्र ०–५२–५० हे. आर. पैकी त्यांच्या ताब्यात असलेल्या मिळकतीस वादीने दाव्याचा निकाल लागेपर्यंत नुकसान पोहचवू नये, स्वरुप बदलू नये आणि अतिक्रमण करु नये असा तात्पुरता मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केला आहे. (सदर मिळकत या पुढे दावा मिळकतीपैकी प्रतिवादीच्या ताब्यातील मिळकत म्हणून संबोधण्यात येईल.)

२. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, दावा मिळकत मौजे कोलमांडले, ता. मुरुड, जि. रायगड येथील गट नं.१२/२ क्षेत्र ०–५२–५० हे. आर. ही वादी व प्रतिवादी यांची वडीलोपार्जित मिळकत असून त्यांचे वडील मयत झाल्यानंतर दिनांक १९/०४/२०१२ रोजी वादी व प्रतिवादी क्र.१ यांच्या ७ बहिणींनी नोंदणीकृत दस्त क्र.३३२/२०१२ द्वारे वादी व प्रतिवादी यांच्या नावे केली आहे. वादी व प्रतिवादी क्र.१ यांच्या मध्ये झालेल्या नोंदणीकृत वाटप पत्राच्या दस्ताद्वारे दक्षीणेकडील क्षेत्र ०-२६-२५ वादीच्या हिश्यास आणि उत्तरेकडील क्षेत्र ०-२६-२५ प्रतिवादी यांच्या हिश्यास मिळाली आहे. सदर वाटपाच्या वेळेस वादीच्या हिश्यास सरकारी रस्त्यालगतची जमीन मिळकत आली असून प्रतिवादीच्या हिश्यास

आलेली जमीन ही सरकारी जमीनीच्या पाठीमागे आहे. प्रतिवादीच्या हिश्यास आलेल्या जागेवर ३५ ते ४० वर्षापासून प्रतिवादीचा ताबा असून नारळ, आंबा, सुपारी व विविध फळांची झाडे आहेत. सदर जमीनीचा उर्वरीत अर्धा भाग वादीस द्यावा लागणार आहे याची कल्पना असल्याने सदर जमीनीच्या मिळकतीचा अर्धा भाग मोजणी करुन त्या जमीन मिळकतीच्या अर्धा भागामध्ये प्रतिवादी यांनी कधीही लागवड व शेती केलेली नाही. सदरचा ओसाड ठेवण्यात आलेला अर्धा भाग वाटणीनंतर वादीच्या हिश्यास आला आहे.

३. दावा मिळकतीच्या अध्र्या भागावर जो ताबा ३५ ते ४० वर्षाच्या अगोदर पासून होता आज सुध्दा तोच ताबा असून प्रतिवादीने तेवढयाच मिळकतीकरीता कुंपण केले आहे. तसेच स्वकष्टाने विहीर (डोरा) खोदून त्याच्या मालकी ताब्यात असणा-या जमीनीकरीता पाण्याची व्यवस्था केली आहे. प्रतिवादी यांनी वादीला दावा मिळकतीपैकी त्याच्या भागामध्ये जाण्यापासून कधी अडवले नाही. याउलट वाटप पत्र आमलात आणण्या अगोदर प्रतिवादी हे वादीच्या हिश्यास आलेल्या जागेतून जात होते. परंतू, त्यानंतर त्यांनी दक्षीणेकडून असलेली त्यांची वहिवाट बंद केली आहे. प्रस्तूतच्या दाव्याचा आणि प्रतिदाव्याचा निकाल होण्यास बराच कालावधी लागणार असून वादी अनाधिकृतरित्या प्रतिवादीच्या हिश्यास व कब्जात असणा-या जमीनीस नुकसान पोहचवण्याची, स्वरुप बदलून टाकण्याची

आणि अतिक्रमण करुन टाकण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे त्यांनी प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्याची मागणी केली आहे.

४. वादीने निशाणी क्र.२६ कडे आपले म्हणणे दाखल करुन वाद मिळकत वडीलोपार्जित मिळकत असून त्याच्या व प्रतिवादी क्र.१ याच्यामध्ये झालेल्या वाटणी पत्रानुसार दक्षीणेकडील मिळकत त्यास आणि उत्तरेकडील मिळकत प्रतिवादी यास देण्यात आली असल्याचे मान्य केले. परंतू, अर्जातील उर्वरित कथने नाकारली आहेत. वादीचे थोडक्यात म्हणणे असे आहे की, त्यांना केवळ दोनच बहिणी आहेत. प्रतिवादी क्र.१ त्यांचा मोठा भाऊ असल्याने त्याने प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार वाटणीपत्र मान्य करुन त्यावर सही केली आहे. परंतू, प्रतिवादी वाटणी पत्राप्रमाणे त्यास हिस्सा देण्यास नकार देत आहेत. दावा मिकतीमध्ये असणारा डोरा हा वडीलोपार्जित असून सदर डो-याचा वापर करण्यास प्रतिवादी त्यास मज्ज्ञाव करत आहे. प्रतिवादी अनाधिकृतरित्या डो-यातील पाणी विकत आहेत. त्यामुळे वादीच्या हिश्यास आलेली आंब्याची, चिकूची, नारळाची, सिताफळाची आणि रामफळाची इत्यादींची झाडे पाणी नसल्याने सुकत चालली आहेत. दावा मिळकतीवर अनाधिकृतरित्या विकास कामे करुन वादीच्या मालकीच्या क्षेत्रावर प्रतिवादीकडून अतिक्रमण होत असल्याबाबत वादीच्या निदर्शनास आले आहे. या कारणास्तव वादीने प्रस्तूतचा अर्ज फेटाळण्याची मागणी केली आहे.

५. प्रतिवादी व वादी यांच्या परस्पर विरोधी कथनावरुन खालील मुद्दे निष्कर्षासाठी माझ्यासमोर प्रस्तुत होतात त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढील प्रमाणे देण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| **१.** | प्रतिवादी त्यांच्या हक्कामध्ये सकृत दर्शनी केस असल्याचे सिध्द करतात का? | **नाही** |
| **२.** | प्रतिवादी तुलनात्मकदृष्टया न्यायाचा समतोल त्यांच्या बाजूने असल्याचे सिध्द करतात का? | **नाही** |
| **३.** | प्रतिवादीचे प्रस्तूतचा अर्ज मंजूर झाला नाही तर त्यांचे पैशाने न भरुन येणार अपरिमित नुकसान होईल असे सिध्द करतात का? | **नाही** |
| **४.** | आदेश काय? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र.१ ते ३ करीता** :–

६. प्रस्तूत अर्जाच्या पुष्ठयात प्रतिवादी यांनी कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. याउलट वादीने निशाणी क्र.४ कडील दाखल कागदपत्राच्या यादीसह दावा मिळकतीचा ७/१२, वाटपत्राची झेरॉक्स, नोटीस आणि नोटीसीचे उत्तर दाखल केले आहे.

७. प्रतिवादींतर्फे विद्वान वकील श्री. ए. व्ही. देशपांडे आणि वादीतर्फे

विद्वान वकील श्रीमती पी. पी. केने यांचा युक्तीवाद ऐकला. तसेच वादीद्वारे निशाणी क्र.३२ कडे दाखल करण्यात आलेल्या लेखी युक्तीवादाचे अवलोकन केले. प्रतिवादीच्या विद्वान वकीलांनी युक्तीवाद केला की, वादीने कधीही जमीन कसली नाही. दावा मिळकत प्रतिवादी विक्री करण्याच्या तयारीत आहे याबाबत वादपत्रात कथन नाही. त्यामुळे प्रस्तूतचा अर्ज फेटाळण्यास पात्र आहे. याउलट वादीच्या विद्वान वकीलांनी वाद मिळकतीचा ७/१२ सामाईक असल्यामुळे वाद मिळकत प्रतिवादीस विक्री करता येणार नाही असा युक्तीवाद केला.

८. दावा मिळकत वादी व प्रतिवादी यांची वडीलोपार्जित मिळकत असल्याची बाब वादात नाही. तसेच निशाणी क्र.४ कडील कागदपत्राच्या यादीसह दाखल करण्यात आलेल्या नोंदणीकृत वाटपाच्या पत्राद्वारे वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये दावा मिळकतीचे विभाजन होवून दक्षीणीकडील ०-२६-२५ हे.आर क्षेत्र वादीच्या हिश्यास आणि उत्तरेकडील ०-२६-२५ हे.आर. क्षेत्र प्रतिवादीच्या हिश्यास आल्याची बाब वादात नाही. परंतू, दावा मिळकतीमध्ये आकारफोड व हद्दकायम झाली नसल्याचे वादी व प्रतिवादी यांनी त्याकरीता वादपत्र आणि कैफियतीमध्ये केलेल्या मोजणीच्या अर्जाच्या संबंधीच्या कथनावरुन स्पष्ट आहे. यावरुन दावा मिळकतीपैकी निश्चीत किती क्षेत्रावर वादीचा ताबा आहे आणि किती क्षेत्रावर प्रतिवादीचा ताबा आहे ही बाब संदिग्ध राहते. त्यामुळे सकृत दर्शनी केस आणि

न्यायाचा तुलनात्मकदृष्टया समतोल प्रतिवादीच्या बाजूने असल्याचे दिसून येत नाही. याशिवाय प्रस्तूतचा अर्ज मंजूर केला नाही तर प्रतिवादीचे अतोनात नुकसान होईल असेही दिसून येत नाही. याशिवाय जरी प्रतिवादी व वादी यांच्यामध्ये दावा मिळकतीपैकी त्यांच्या वाटयाला आलेल्या क्षेत्राबद्दल वाद असला तरी वाटप पत्राच्या दस्ताद्वारे दावा मिळकतीचा सम-समान हिस्सा झाला असल्याचे स्पष्ट आहे. अशा परिस्थितीमध्ये वादीच्या विरुध्द मनाई हुकूम जारी करणे योग्य होणार नाही. करिता मी मुद्दा क्र. १ ते ३ यांची उत्तरे नकारार्थी देवून खालील आदेश पारित करतो -

**आदेश**

१. अर्ज फेटाळण्यात येतो.

२. पक्षकारांनी अर्जाचा खर्च आपापला सोसावा.

(खुल्या न्यायालयात जाहिर)

SANDEEP G SARODE
Digitally signed by SANDEEP G SARODE
Date: 2023.10.11 18:50:52 +0530

(सं. गं. सरोदे)

दिनांक : १०/१०/२०२३ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मुरूड